# 'झाडाझडती' कादंबरीतील धरणग्रस्तांच्या व्यथा – वेदना

**प्रा. डॉ. केशव विठ्ठल आलगुले**
मराठी विभाग
जयक्रांती कला वरिष्ठ महाविद्यालय, लातूर.
keshavalgule11@gmail.com

*स्वातंत्र्योत्तर काळामध्ये मराठी साहित्य प्रवाहामध्ये अमुलाग्र बदल होऊन अनेक नवीन साहित्य प्रकार उदयाला आले,आणि ते मूळ साहित्य प्रवाहात विलीन झाले. विकासाचे धोरण स्वीकारल्यामुळे ग्रामीण भागातील विकास तर झाला, त्याबरोबर काही प्रश्नही निर्माण झाले. त्याचे लेखन अनेक मराठी साहित्य प्रकारात झाले. अनेक लेखकानी आपल्या लेखणीतून वेगवेगळ्या समस्यांना वाचा फोडली. त्यामध्ये ग्रामीण भागात धरणग्रस्तांच्या व्यथा - वेदनांना वाचा फोडणारे लेखक म्हणून विश्वास पाटील यांना ओळखले जाते.विश्वास पाटील हे मराठीतील प्रसिद्ध कादंबरीकार लेखक आहेत. भारतीय प्रशासकीय सेवेतील प्रशासक म्हणून निवृत्त अधिकारी आहेत. त्यांचा जन्म दि. 28 नोव्हेंबर, 1959 रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील नेरले या गावी शेतकरी कुटुंबात झाला. इ. स. 1986 साली त्यांनी सरकारी नोकरीस सुरुवात केली.इ. स.1960 मध्ये भारतीय प्रशासकीय सेवेत अधिकारी झाले. विश्वास पाटील हे रायगड जिल्ह्यात मुख्य कार्यकारी अधिकारी काम पाहिले. मुंबई उपनगर येथे जिल्हाधिकारी म्हणून काम केले. प्रशासकीय सेवेत काम करतानाही उत्कृष्ठ साहित्यकृतीची निर्मिती केली आहे. विश्वास पाटील यांची साहित्य निर्मिती पाहिली तर 'पानिपत' (ऐतिहासिक कादंबरी)'झाडाझडती' (कादंबरी), 'नॉट गॉन विथ द विंड' (लेखसंग्रह), 'पांगिरा' (कादंबरी), 'रणांगण' (नाटक) चंद्रमुखी (कादंबरी),महानायक (कादंबरी) 'लस्ट फॉर लालबाग, (कादंबरी), 'संभाजी' (ऐतिहासिक कादंबरी) अशा प्रकारची साहित्यनिर्मिती करून साहित्य क्षेत्रामध्ये अतिशय अनमोल अशी निर्मिती केली आहे. त्यांची 'पानिपत' ही कादंबरी 1988 मध्ये प्रकाशित झाली.*

'पानिपत' या कादंबरीमध्ये पानिपतच्या तिसऱ्या युद्धाचे वर्णन आले आहे. मोहम्मद शहा आणि मराठा यांच्यात झालेल्या युद्धात मराठ्यांच्या पराभवाचे वर्णन आले आहे. या कादंबरीविषयी ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त साहित्यिक वि. वा. शिरवाडकर यांनी समीक्षा करताना म्हटले आहे. "सुंदर आणि भव्य वर्णनात्मक शैली असल्यामुळे या कादंबरीला यशाची उंची गाठता आली" पानिपत या कादंबरीच्या दोन वर्षांमध्ये वीस हजार पेक्षा जास्त प्रती विकल्या गेल्या.

'झाडाझडती' कादंबरी 1990 मध्ये प्रसिद्ध झाली. 'झाडाझडती' ही 477 पृष्ठांची कादंबरी आहे.'झाडाझडती' या कादंबरीच्या सतरा आवृत्त्या निघाल्या आहेत.या कादंबरीला इ. स. 1992 साली 'साहित्य अकादमी, नवी दिल्लीचा पुरस्कार मिळाला.'झाडाझडती' या कादंबरीमध्ये महाराष्ट्रातील विविध विकास कामाचे (धरण प्रकल्पाचे) आणि त्यातून होणाऱ्या व्यवस्थापनाचे वर्णन त्यांनी केले आहे. विश्वास पाटील हे पुण्यामध्ये पुनर्वसन अधिकारी म्हणून काम करताना त्यांना आलेले अनुभव त्यांनी या कादंबरीत मांडले आहेत.

*'झाडाझडती' या शीर्षकाचा अर्थ 'झाडाझडती' म्हणजे झाडांनी दिलेली झडती पूर्व जन्माची पापे या जन्मी फेडणे, झाड हा शब्दचं दुःख या अर्थी आहे. खेड्यात झाड धरणे म्हणजे याचा अर्थ भुताने वा अज्ञात शक्तीने झपाटणे असा आहे. याचा अर्थ कधीही न संपणारे दुःख देणे असा होतो. असा या शीर्षकाचा अर्थ आहे.'झाडाझडती' कादंबरीचे इतर भाषेत झालेले अनुवाद हिंदी अनुवाद डॉ. गजानन चव्हाण.कन्नड अनुवाद डॉ. चंद्रकांत पोकळे. इंग्रजी अनुवाद डॉ. किर्ती रामचंद्र. उर्दू अनुवाद साजिद रशिद. गुजराती अनुवाद डॉ. प्रतिभा दवे. मल्याळम अनुवाद कालीनाथ दमोदरण. आसामी अनुवाद भरत ठाकूर.*

'महानायक' ही कादंबरी नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवनावर आधारित आहे. त्यांना या कादंबरीचे संदर्भ शोधण्यासाठी व माहिती मिळविण्यासाठी अनेक देशांमध्ये प्रवास करावा लागला, त्यातून अतिशय उत्कृष्ट अशी ही कादंबरी निर्मिती झाली आहे. 'चंद्रमुखी' कादंबरी महाराष्ट्रातील एका नृत्यांगनाचे राजकीय नेत्यांसोबत असलेल्या संबंधावर आधारीत ही कादंबरी त्यांनी लिहिली आहे.'संभाजी' कादंबरीसाठी लेखकाने अनेक शोध संशोधन व इतिहास संबंधी शिल्प कोरल्या सारखे लिहिलेले आहेत. त्यातून संभाजी विषयी अतिशय सविस्तर माहिती या कादंबरीत दिलेली आहे. विश्वास पाटील यांच्या प्रकाशित कादंबऱ्यांचे अनुवाद विविध भाषांमध्ये झालेले आहेत.

**विश्वास पाटील यांच्या ग्रंथांचे विविध भाषांमध्ये झालेले अनुवाद :-**

'पानिपत' हिंदी अनुवाद मोरेश्वर ग तपस्वी, गुजराती अनुवाद डॉ. प्रतिभा दवे, पंजाबी अनुवाद पंजाब सरकार, पटियाला. कन्नड अनुवाद डॉ. चंद्रकांत पोकळे,'पांगिरा' हिंदी अनुवाद प्रकाश भातांब्रेकर, कन्नड डॉ. चंद्रकांत पोकळे. 'झाडाझडती' हिंदी अनुवाद डॉ. गजानन चव्हाण, कन्नड अनुवाद डॉ. चंद्रकांत पोकळे, इंग्रजी अनुवाद डॉ. किर्ती रामचंद्र, उर्दू अनुवाद साजिद रशिद, गुजराती अनुवाद डॉ. प्रतिभा दवे, मल्याळम अनुवाद कालीनाथ दमोदरण, आसामी अनुवाद भरत ठाकूर,'महानायक' हिंदी अनुवाद डॉ. रामजी तिवारी, गुजराती अनुवाद प्रतिभा दवे, कन्नड अनुवाद चंद्रकांत पोकळे, राजस्थानी अनुवाद सत्यनारायण स्वामी, मल्याळम अनुवाद माधवन पिलाई, इंग्रजी अनुवाद डॉ. किर्ती रामचंद्र, बंगाली अनुवाद केंद्र चक्रवर्ती, उडीसा अनुवाद तेज पब्लिकेशन, तमिळ डॉ. एस. शुभ्रयम, 'चंद्रमुखी' हिंदी अनुवाद डॉ. रामजी तिवारी और रमेशचंद्र तिवारी, मल्याळम अनुवाद कालिया दामोदरम 'संभाजी, हिंदी डॉ. रामजी तिवारी.

**विश्वास पाटील यांना मिळालेले सन्मान :-** नाथ माधव पुरस्कार 1989 (पानिपत).प्रियदर्शनी राष्ट्रीय पुरस्कार 1990 (झाडाझडती).भारतीय भाषा परिषद पुरस्कार 1989 (पानिपत).विखे पाटील पुरस्कार 1990 (झाडाझडती). साहित्य अकादमी पुरस्कार 1990 (झाडाझडती).गडकरी पुरस्कार 1998 (महानायक). **याशिवाय इतर अनेक पुरस्कारांनी विश्वास पाटील यांचा सन्मान करण्यात आलेला आहे.**

**झाडाझडती कादंबरीतील धरणग्रस्तांच्या व्यथा-वेदना :-**

विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही कादंबरी विकासाच्या नावाखाली भरडल्या जाणाऱ्या निष्पाप धरणग्रस्तांच्या जीवांचे व त्यांच्या कधीही न संपणाऱ्या दु:खाची करून कहाणी आहे. 'झाडाझडती' म्हणजे झाडांनी दिलेली झडती पूर्व जन्माची पापे या जन्मी फेडणे, झाड हा शब्दचं दु:ख या अर्थी आहे. खेड्यात झाड धरणे म्हणजे याचा अर्थ भुताने वा अज्ञात शक्तीने झपाटणे असा आहे. याचा अर्थ कधीही न संपणारे दु:ख देणे असा होतो. असा या शीर्षकाचा अर्थ आहे. या कादंबरीत लेखकाने धरणग्रस्तांच्या कथा, दु:ख, वेदना, नाकेबंदी, पावलोपावली केली जाणारी अडवणूक, शेती जेव्हा धरणात जाते तेव्हा विस्थापनाचा गंभीर प्रश्न समोर येतो. शासनाकडून जमिनीचा योग्य मोबदला दिला जात नाही. पुनर्वसित गावांमध्ये त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. तेथे येणाऱ्या अनेक अडचणी आहेत. त्यामध्ये

**'झाडाझडती' मधील धरणग्रस्तांच्या समस्या**

धरणग्रस्तांच्या गावठाणाचा प्रश्न, घरांची समस्या, पिण्याच्या पाण्याची समस्या, आरोग्यविषयक समस्या, स्वस्त धान्य दुकानांची समस्या, रस्त्याची समस्या, स्मशानभूमींची समस्या, धरणग्रस्तांच्या मुलामुलींच्या विवाहाची समस्या, मिळालेल्या जमिनीची समस्या,धरणग्रस्तांच्या स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचाराची समस्या,त्या भागात येणाऱ्या अधिकारी व राजकारणी व्यक्तीकडून होणारा त्रास, लाभ क्षेत्रातील लोकांकडून होणारा त्रास, धरणग्रस्तांच्या बलुतेदारांची समस्या, धरणग्रस्तांच्या मुलांच्या शाळेची व शिक्षकांची समस्या, दळणवळण वाहतुकीची समस्या, पुनर्वसित गावात पाळल्या जाणाऱ्या पाळीव प्राण्यांची समस्या, कायदा व सुव्यवस्थेकडून होणारी ससेहोलपट, अशा अनेक समस्या केंद्रस्थानी ठेवून साकारलेली ही 'कादंबरी' आहे.

**धरणग्रस्तांच्या गावठाणाची समस्या :-**

मोठे धरण बांधणे हे विकासाचे स्वप्न साकार करण्यासाठी उचललेले एक प्रगतीशील पाऊल नसते, तर संस्कृतीचा ऱ्हास करणाऱ्या दैत्यांचे विनाशकारी पाऊल असते. मोठ्या धरणाच्या बांधकामाच्या संकल्पनेपासून ते पूर्ण होणाऱ्या प्रक्रियेपर्यंत एक भयंकर संकटाने लोकांचे आयुष्य

भरडले जात असते, ती राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक सर्वच दृष्टीने गुंतागुंत असते. या गुंतागुंतीचे व्यामिश्र वर्णन ह्या कादंबरीत आले आहे. या कादंबरीत महात्मा गांधीजींच्या तत्त्वप्रणाली शिंगाडे पाटील यांचे नेतृत्व विकसित झाले, परंतु लोक कल्याणाचे स्वरूप हळूहळू समाजहिताचा कडून स्वहिताकडे जाते. सत्तेसाठी केल्या जाणाऱ्या तडजोडी, स्वतःच्या स्वार्थासाठी चाललेली जीवघेणी स्पर्धा आशा अनेक गोष्टींमुळे शिंगाडे पाटील देखील बदलले जातात. धरणाचे स्वप्न साकार करून आपला परिसर ओलिताखाली आणला जातो. हे स्वप्न साकार करताना धरणात ज्यांची गाव उडाली त्यांना नवीन घरे उभे करण्याची समस्या धरणग्रस्त पुढे असते, सार्वजनिक हितासाठी धरणात आपली खाजगी मालमत्ता अर्पण करणाऱ्या धरणग्रस्तांनी विस्थापनासाठी गावठाणासाठी जागा मिळण्याचा प्रश्न पुढे येतो. खासदार शिंगाडे जाहीर सभेमध्ये बोलतात "तालुक्यात धरणग्रस्त आणि लाभ क्षेत्रातील लोकांनी एकत्रित येऊन, एक होऊन, विकास गंगेच्या कावडी प्रत्येक चावडीवर पोहोचवायला पाहिजेत. पण का कोणास ठाऊक वाघेठान तालुक्यात या दोन्ही शक्तीमध्ये टेडं दिसते. धरणग्रस्तांना भूसंपादन व गावठाणे बांधली जाण्यासाठी नळ, पाणी, समाजमंदिर, गुऱ्हासाठी रिकामी जागा, वाड्यांची सोय केली जाईल, प्रत्येकाला राहण्यासाठी वेगळा भूखंड दिला जाईल. घरं बांधण्यासाठी कर्ज, अशी आश्वासने दिली जातात. मात्र प्रत्यक्ष जांभळीचे लोक पुनर्वसनासाठी खैरापूरला जातात. तेव्हा तेथील लोक यांना उद्देशून म्हणतात 'घरचं झालं थोडं' व्याह्यान धाडलं घोडं' धरणग्रस्तांना बस स्टँड जवळची जागा दाखविली जाते. पण खासदार पुत्र सर्जेराव शिंगाडे प्रत्यक्ष देत नाहीत. अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करून दलदलीची पडीक जमिनी धरणग्रस्तांना गावठाणा साठी दिली जाते. ती जागा पाहून खैरमोडे गुरुजी म्हणतात. "तिथं भूत सुद्धा राहात नाहीत, आम्ही माणसांनी कसं राहावं. शिवाय आजुबाजूला शेती, उद्या रानाला पाणी, लागलं दलदल झाली, तर त्या जागेवर आम्ही धरणग्रस्तांनी कसा जन्म काढायचा" शेवटी धरणग्रस्तांना तीच दलदलीची जागा गावठाणा साठी दिली जाते.

**धरणग्रस्तांच्या जमिनीची समस्या :-**

'झाडाझडती' कादंबरीत विकासाच्या कावडी एकमेकांच्या खांद्यावर घेऊन जायच्या असे खासदार सिंगाडे पाटलांचे विचार आहेत. पण प्रत्यक्षात धरणामध्ये ज्यांची जमीन काढली जाते. त्यांच्या जमिनीचा प्रश्न उभा राहतो, त्यांना पर्यायी जमीन ह्या लाभ क्षेत्रात येणाऱ्या लोकांच्या जमिनीचा काही भाग काढून दिला जातो, पण त्यामध्ये अनेक अडचणी येतात. त्यात अडचणी आणि लेखकांचा अतिशय जवळचा संबंध आल्याचे जाणवते. जांभळी, झांजवाडी, येरलेवाडी, मसनमाळ येथील लोकांच्या जमिनीतील कष्ट करण्याचे वर्णन लेखकाने अगदी हुबेहूब केले आहे. अनेक प्रकारच्या कथांमध्ये शेतीविषयक कामाचे वर्णन करताना, शेतीतील नांगरणी, बैल किंवा रेडा नांगराला जुंपताना होणारा त्रास, पेरणी, भाजणी, कापणे, राखण करणे इत्यादी लेखकाने अतिशय मार्मिक व तपशीलवार वर्णन केले आहे. आवडाई, हैबती, नकुसा, फुला यांनी शेतात घरात केलेल्या कष्टाचं वर्णन तसेच गुणवंता, कुशाप्पा यांनी शेतात केलेल्या कष्टांचे वर्णन वाचताना पदोपदी एक गोष्ट जाणवते की या गोष्टी लेखकाने केवळ पाहिल्याच नाहीत, तर प्रत्यक्ष काम केल्याचे जाणवते. गावच्या लोकांच्या जमिनी म्हणजे केवळ त्यांच्या उदरनिर्वाहाचे साधन नसून त्यांची त्या मातीशी जोडलेली नाळ असते. लागेबांधे असतात. त्यामुळे या माती बाहेर आपल्याला फेकले जाईल या कल्पनेने थरकाप झालेला गोविंदा विहिरीत उडी घेऊन आत्महत्या करतो. त्याची पत्नी आवडाई गाव सोडायला तयार नसते. धरणग्रस्त कसेतरी जीवाच्या आकांताने गाव सोडतात तर नवीन लाभक्षेत्रात मिळणाऱ्या जमिनीवर मूळ मालक 'स्टे' घेतात. आमच्या वाटण्या झाल्या नाहीत, आमची घरगुती भांडणे आहेत अशी कारणे देतात. काही मालक तर म्हणतात "साहेब ह्या धरणग्रस्तांना जमीन द्यायच्या तर नदीकाठच्या कशाला, माळाच्या द्या, माळाच्या जमिनी घेतल्या म्हणून त्यांना कुठे टोचतात का..? असे म्हणतात 'आम्हाला धरण बी नको आणि धरणाचं पाणी बी नको' अशी भूमिका मूळ मालक घेतात. त्यामुळे धरणग्रस्तांना पडीक झाडे-झुडपे असलेली जमीन दिली जाते. या जमिनी पिकाखाली आणण्यासाठी चार-चार वर्ष मेहनत घ्यावी लागते. त्यातही पीक डोलायला लागले की मूळ मालकाचे डोळे फिरायला लागतात. त्या जमिनी परत मिळवण्यासाठी प्रयत्न करतात. त्या परत मिळत नसतील तर त्यात जनावरे सोडतात. असे प्रश्न कादंबरीत अनेक आलेले आहेत, असा संघर्ष सावळेराम, गोम्या कोळी, यांना करावा लागतो. हैबतीला सात वर्ष कष्ट करूनही सातबारावर नाव

येत नाही. ताबापावती मिळत नाही. मोठ्या कष्टाने पिकवलेली उसाचे पीक मूळ मालकाच्या नावे लागते. या भांडणातून हैबतीचा खून होतो. जमिनीचा संघर्ष कायम सुरू असतो.

**धरण विभागात येणाऱ्या अधिकाऱ्यांची समस्या :-**

सार्वजनिक हितासाठी ज्यांनी खाजगी मालमत्ता अर्पण केली त्यांच्या जीवन-मरणाच्या समस्या, त्यांच्या व्यथा-वेदना या अधिकारी वर्गाला कट वाटतात. "त्यांची गाव उठली म्हणजे जगावर उपकार केल्यासारखे त्यांना वाटते" असा त्या अधिकाऱ्यांचा समज असतो. पुनर्वसन विभागात बदली होणे अथवा नोकरी करणे म्हणजे त्यांच्यापुढे अनेक प्रश्न उभे राहतात. "अहो कशाला फुकट मरता..? पुनर्वसनाचे ते काय काम आहे का..?, त्यात धरणग्रस्तांच्या प्रश्नांना अंत असतो का..? तिथे चांगला स्टाफ कोणी देत नाही. तो चार्ज स्वीकारलेला माणूस सहीसलामत सुटतो का..? ती धरणग्रस्त काय माणसं असतात का..?, जीवावर उटतात ते माणसं..!" असे अनेक प्रश्न अधिकारी वर्गाच्या मनात येतात. आपण प्रशासकीय सेवेत आहोत. शासनाच्या वतीने या गरीब जनतेची सेवा करण्यासाठी आलो आहोत. या गरीब धरणग्रस्तांना आपण शासनाच्या योजना दिल्या पाहिजेत. हे विसरून धरणग्रस्तांना अपमानित करतात. नीट बोलत नाहीत. त्यांची मदत करत नाहीत. या कादंबरीत अनेक अधिकारी आले आहेत. त्यामध्ये जिल्हाधिकारी आणि देशमुख व पवार साहेब हे दोनच अधिकारी प्रामाणिक आहेत, तर एकबोटे, भोसले, पत्रावले, वाघमारे, पिळगावकर, निंबाळकर, सोनार, पोलीस अधिकारी नलावडे, चोरगे कारकून इत्यादी अधिकारी तर पुढाऱ्यांनी ठेवलेल्या बायाच वाटतात. मसनमाळ आणि इरलेवाडी या गावच्या लोकांचे धरणात गेलेल्या जमीन व घराचे पैसे वाटप करत असताना वाघमारे साहेब म्हणतात "उद्व्यापी लोकांना उद्योग नसतो, धरणात गावं उठली म्हणजे जगावर उपकार केलेत वाटतं त्यांना" धरणग्रस्तांच्या हक्काचे पैसे मिळतानाही त्यांना अपमान, त्रास सहन करावा लागतो.

जिल्हाधिकारी अनिल देशमुख साहेबांच्या काळात मात्र धरणग्रस्तांचे अनेक प्रश्न मार्गी लागतात. धरणग्रस्तांच्या जमिनीचे प्रश्न, नळ योजनांचा प्रश्न, स्मशानभूमीच्या प्रश्न, दवाखान्याचा प्रश्न, दवाखान्याची व्यवस्था, धरणग्रस्तांच्या मुलांना नोकरी लागते पण पर्मनंट करण्याचा प्रश्न सोडविण्याचा चांगला प्रयत्न केला जातो. मात्र सबनीस साहेब गावठाणची जागा बदलतात. निंबाळकर साहेबांकडून हैबतीला अपमानित व्हावे लागते. धरणग्रस्तांना कुठे अडवायचे आणि कसे अडवायचे हे चोरगे कारकुनाला चांगलेच माहीत होते. पत्रावळे साहेब, मोजणीदार रोटे, दामले सर्कल, या लोकांची धरणग्रस्तांना वेगळीच वागणूक असते. खैरपुरच्या शिल्लक जमिनीचे रजिस्टर लपविली जाते हैबतीच्या शेतातील बाबळीचे झाड तोडले जाते, तेव्हा अधिकारीवर्ग त्याचा रिपोर्ट साक्षीदाराला अभावी उलट फिरवतात. सातबारावर हैबतीचे नाव लावण्याऐवजी ताबापावती नामंजूर होते. त्यांच्या नोकरीचे 240 दिवस पूर्ण होऊ दिले जात नाहीत, अशी अधिकारी वर्गाची भ्रष्ट नीती धरणग्रस्तांच्या जीवन-मरणाशी खेळते हैबतीच्या खुनाचा रिपोर्ट नलावडे पोलीस अधिकारी उलट करतो. कधीही दारुन न पिलेल्या हैबतीच्या पोटात 'अल्कोहल' निघते हे अधिकारी वर्गाच्या भ्रष्टाचारी वृत्तीचे वर्णन विश्वास पाटील यांनी या कादंबरीमध्ये सविस्तर मांडले आहे

**'झाडाझडती' कादंबरीमधील राजकारण :-**

विश्वास पाटील यांनी 'झाडाझडती' या कादंबरीचा आवाका अतिशय व्यापक आणि विस्ताराने घेतला आहे. त्यामध्ये धरणग्रस्तांच्या व्यथा-वेदना त्यांनी केंद्रबिंदू म्हणून महत्त्व दिले आहे, असे असले तरी धरणग्रस्तांना उघड उघड विरोध न करता किंवा धरणग्रस्तांच्या व्यथा वेदनांना बाजूला ठेवून आपले सुख समाधान शोधणे याकडे लक्ष देणाऱ्या व्यक्तिरेखा या कादंबरीत आहेत. त्यांनी केलेल्या कार्यावरून त्यांचे राजकारण स्पष्ट दिसते. धरण आणि धरणाच्या राजकारणाचा प्रश्न व गावातल्या गावात नको असलेले राजकारण व त्या काळात, त्या वेळी बदलती भूमिका घेणारे खासदार शिंगाडे पाटील, चेअरमन सर्जेराव शिंगाडे यांचे राजकारण धरण उभारणीच्या निमित्ताने उभे राहते. नव्या गावठाणाला बास्टॅन्ड जवळची जागा देताना सर्जेराव म्हणतात. "नव्या गावठाणात अठरापगड जातीचा समाज, पूर्वेकडून - पश्चिमेकडे वाहणारा वारा, त्या शेजारी असलेल्या देव महादेव त्यास बाटवणार का...? असे म्हणून धरणग्रस्तांना गावठाणाची बसस्टँड जवळची जागा दिली जात नाही, तेथे राजकारण स्पष्ट दिसते. धरणग्रस्तांना दिलेली आश्वासने राजकारणी लोक बदलतात. धरणाला मान्यता द्या तुम्हाला सिमेंटचे रोड, नळाच्या कारंज्या, विजेची सोय, स्वर्गसुख,

देण्याचे आश्वासन सभा संपल्यावर शिंगाडे पाटील विसरून जातात. ही आश्वासने म्हणजे खासदार शिंगाडे यांनी धरणग्रस्तांच्या जिभेला लावलेले मधाचे बोट असते. खासदाराचा उद्देश असतो की येथे धरण बांधले की यावर पाणी येणार, पाणी आल्यावर साखर कारखाना उभारला, त्यानंतर दुधाची मोठी योजना राबविण्याचे, परिसर हिरवा झाल्याने दूध दुभते वाढविणार, या परिसरात पर्यटन केंद्र, शिवाय मोठ-मोठे दोन हॉटेल उभारायचे होते. राजकारण म्हणजे धरणग्रस्तांच्या प्रेताच्या टाळूवरचे लोणी चालल्यासारखे असते.

'झाडाझडती' या कादंबरीमध्ये याशिवाय अनेक प्रश्न मांडले आहेत. धरणग्रस्तांच्या मुला-मुलींचे सोबत इतर गावातील विवाह संबंध जोडण्यास पुढे येत नाहीत. यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न, त्यांच्या मुलांच्या नोकरीचा प्रश्न, आर्थिक परिस्थितीचा प्रश्न, असतो याशिवाय त्यांच्या स्त्रियांवर झालेल्या अन्याय - अत्याचाराचा प्रश्न, समाजामध्ये धरणग्रस्त आणि मुळगावकरी असा संघर्ष कायम सुरू होतो. अशा अनेक समस्या या कादंबरीतून मांडल्या आहेत. यामध्ये कोणीही

**झाडाझडती मधील व्यक्तिरेखा**

प्रमुख व्यक्तिरेखा नायकस्थानी घेतलेली नाही. धरणग्रस्त हेच या कादंबरीच्या नायक स्थानी आहेत.त्यामध्ये वसंता खैरमोडे, आवडाबाई, हैबत्ती, सुभानराव, कुशापा धनगर अशा काही प्रमुख व्यक्तिरेखा कादंबरीमध्ये ठळक दिसतात. याशिवाय जवळपास 78 व्यक्तिरेखा या कादंबरीत कमी-जास्त प्रमाणात आलेल्या आहेत.इतर व्यक्तिरेखा या प्रसंगानुरुप कादंबरीत येतात आणि घटना आणि प्रसंगाच्या माध्यमातून कथानकाचा सांधा भरून निघून जातात. त्यामध्ये पुरुष व्यक्तिरेखा, स्त्री व्यक्तिरेखा, मजूर व्यक्तिरेखा, कामगार, तरुण, वृद्ध, बाल व्यक्तिरेखा, आलुतेदार-बलुतेदार, अधिकारी, कर्मचारी ई.

अशा वेगवेगळ्या प्रकारच्या व्यक्तिरेखा आलेल्या आहेत. या कादंबरीची भाषा ही ग्रामीण भागातील प्रसंगानुरूप त्या-त्या परिसरात वापरल्या जाणाऱ्या शब्दप्रयोगासह बोलीचा वापर केलेला आहे. म्हणी- वाक्प्रचाराचा प्रसंगानुरूप वापर यामध्ये केलेला आहे. यामुळे लेखकाला वातावरण निर्मिती करणे आणि त्या परिसरातील प्रादेशिकता ववर्णन करणे सहजपणे शक्य झाले आणि कादंबरीला योग्य उंचीवर घेऊन जाता आले. या कादंबरीतील संवाद हे दोन पात्रमध्ये तर कधी समूहामध्ये झालेले आहेत. संवाद वाचकांच्या मनावर प्रतिमां आणि प्रतिकाच्या माध्यमातून समाजातले हुबेहूब पात्रे वाटायला लागतात. त्यामुळे वाचकांच्या मनाची पकड या कादंबरीत शेवटपर्यंत ठेवली जाते. या कादंबरीच्या माध्यमातून विश्वास पाटील यांनी अतिशय सविस्तरपणे धरणग्रस्तांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

**निष्कर्ष :-**

'झाडाझडती' कादंबरीमध्ये धरणात भरडल्या गेलेल्या धरणग्रस्तांच्या हाती मात्र भिकेची थाळीच येते. 'समृद्धी राजकारण्यांना आणि भिकेची थाळी धरणग्रस्तांना' अशी परिस्थिती त्यांच्या नशिबी कायम असते. 'झाडाझडती' मध्ये धरणग्रस्तांच्या पाठीमागे उभे असणारे खैरमोडे गुरुजी आपल्या पराभवाची कबुली देताना पत्रकारांशी म्हणतात, "आम्हाला इंद्राची इन्द्रपुरी नको, शेतकऱ्यांना जमीन, गुरांना गोठा, पोरांना शाळा आणि राहण्यासाठी घर, धरणग्रस्तांची एवढी साधी अपेक्षाही शासनाकडून पूर्ण होत नाही" अशी खंत व्यक्त होते. अशा स्वरूपाचे काही निष्कर्ष या कादंबरीच्या अभ्यासांती समोर येतात ते पुढीलप्रमाणे आहेत.

1. विश्वास पाटील यांचे बालपण ग्रामीण भागात गेल्यामुळे त्यांना ग्रामीण भागातील माणसांचे दु:ख व्यथा-वेदना यांचे चित्र हुबेहूब आणि ताकतीने उभे करता आले.
2. 'झाडाझडती' या कादंबरीचे कथानक संथ गतीने पुढे सरकते या कादंबरीमध्ये धरणग्रस्तांच्या जीवनाचा पंधरा-वीस वर्षाचा विशाल कालखंड विलक्षण ताकतीने चित्रित केला आहे.
3. 'झाडाझडती' कादंबरीमध्ये व्यक्तिरेखांची गर्दी आहे, असे वाटते पण विश्वास पाटलांनी धरणग्रस्तांच्या व्यथा - वेदना इतक्या बारकाईने मांडले आहेत, की या संबंध कादंबरीचा विषय आणि आवाका लक्षात घेतल्यास वाचकाला प्रत्येक पात्र आपलेसे वाटायला लागते.
4. 'झाडाझडती' कादंबरीमध्ये आलेल्या धरणग्रस्तांच्या व्यथा-वेदना या केवळ एका व्यक्ती पुरत्या मर्यादित नाहीत, तर संपूर्ण समाज जीवनाशी निगडित आहेत.
5. 'झाडाझडती' या कादंबरीमध्ये विस्थापित झालेल्या धरणग्रस्तांना घरे बांधण्यासाठी गाव वसवण्यासाठी

चांगली राहण्यायोग्य जमीन मिळत नाही. ही त्यांच्या समर्पणाची शोकांतिका वाटते.

6. 'झाडाझडती' कादंबरीमध्ये धरणग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी शासनाने पाठवलेले अधिकारी अपवाद जिल्हाधिकारी अनिल देशमुख व दिलीप पवार हे सोडले तर बाकीच्या अधिकाऱ्यांची भ्रष्टाचारी वृत्ती समोर येते.
7. ज्या धरणग्रस्तांनी आपले सर्वस्व प्रकल्पाच्या घशात कोंबले. त्या धरणग्रस्तांना पिण्याचे पाणीही वेळेवर मिळत नाही. त्यासाठी त्यांना अनेक वेळा भीक मागावी लागते.
8. धरणग्रस्तांच्या समस्या सोडविण्यासाठी त्यांना जिवंतपणी दररोज पावलोपावली मरण यातना सहन कराव्या लागतात. आणि मेल्यावर सुद्धा स्मशानभूमीसाठी झडती द्यावी लागते. यावरून स्मशानभूमीची समस्या लक्षात येते.
9. धरणग्रस्तांच्या मुलासाठी चांगली शाळा मिळत नाही. तेथे चांगले शिक्षक जात नाहीत. त्यांच्या मुलांना शाळेत चांगली वागणूक मिळत नाही.
10. धरण झाल्यामुळे विस्थापित झालेल्या आलुतेदार - बलुतेदारांना आपला पारंपरिक व्यवसाय सोडून त्यांच्या उपजीविकेचा नवीन प्रश्न निर्माण होतो.
11. विस्थापित झालेल्या स्त्रियावर समाजातील समाजकंटक काकाकडून बऱ्याच वेळा अन्याय-अत्याचार केलेला दिसून येतो.
12. धरणग्रस्त विरुद्ध लाभक्षेत्र अशा दोन गटांमध्ये संघर्षाची दरी निर्माण होते.
13. "चौऱ्यांशी लक्ष योनीतून किडा-मुंगी कशाचाही जन्म दे, परंतु तो धरणग्रस्तांच्या पोटी जन्म देऊ नकोस" असे आवडाबाईच्या तोंडून उद्गार येतात. या धरणग्रस्तांच्या व्यथा म्हणजे रोज त्यांना मेल्याहून मारल्यासारखे जीवन जगावे लागते.

**संदर्भ ग्रंथ :-**


1. 'झाडा-झडती' - विश्वास पाटील, राजहंस प्रकाशन, सदाशिव पेठ पुणे. आवृत्ती 13 वी जून 2007 प्र.अ. 1990.
2. माग्गीरवार गो. म. 'बिटविन द लाईन्स' मुक्तरंग प्रकाशन, लातूर.प्र. आ.2007.
3. www. bookganga.com.
4. Zadazadti Marathi book review bsensibal media production SMP.
5. www.bookjatra buildabazaar.com.